REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ५ जून, १९४० अंक २३

S. P. MANDALI'S

## SCHOOL OF COMMERCE

( Estd., 1933 )

*Near Gokhale Hall,*

*POONA, 2.*

The Premier House of Business Education in the Presidency ; The only Recognised Institution in Poona preparing students for Government Diploma and Certificates in Commerce. One year's Ideal Course in Accountancy, Banking, Commerce and Finance, Correspondence, Type writing etc.

New session from <u>20th June 1940</u>; Matriculation minimum qualification for admission ; Admission limited ; Last date 15th July ; Apply for Prospectus :

Office Hours : 8 to 11 a. m.

SUPERINTENDENT.

फर्म, कंपनी, सोसायटी

## कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांची तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड :: नागपूर शहर

## Sir Parashurambhau College, Poona 2

The College opens on June 20, 1940. Students should secure their admission early by enrolling their names in the college office. The College Prospectus giving all necessary information and containing the required application forms (for the hostels—both for men and women) will be sent gratis on request.

Prospectus for the T. D. Courses of the University of Bombay will also be supplied free on request.

R. D. KARMARKAR
Principal

## ठाकरसी कॉलेज, पुणें ४.

श्री. ना. दा. ठा. महिला पाठशाळा, येरंडवणें, या संस्थेच्या कामाची सुरवात उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर सोमवार, ता. १७ जून १९४० पासून होईल. वसतिगृह १७ तारखेसच सकाळीं ८ पासून सुरू होईल. माहितीसाठीं खालील पत्त्यावर समक्ष भेटावें अगर पत्रव्यवहार करावा.

कमलाबाई देशपांडे
प्रिन्सिपल.
ठाकरसी महिला पाठशाळा, पुणें ४.
ऑफिसची वेळ, सकाळीं ९ ते ११.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

Examiner Press Building, Dalal Street, Bombay

716 Sadashiv Peth, Poona City

## विविध माहिती

**दोस्त राष्ट्रांचें बलाढ्य आर्थिक सामर्थ्य**

ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हेकिया मिळून जर्मनीची लोकसंख्या ९ कोटि पेक्षा कमी असून त्या राष्ट्राचें वार्षिक उत्पन्न २,६०० कोटि डॉलर आहे. ह्याच्या उलट, इंग्लंड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड व फ्रान्स ह्यांची मिळून लोकसंख्या ११ कोटि असून वार्षिक उत्पन्न ४,६०० कोटि डॉलर आहे.

**हिंदुस्थानांत फौज, विमानें व लढाऊ सामुग्री वाढणार**

चालू युद्धाचे दृष्टीनें ह्या देशांतील हिंदी फौज, वैमानिक दल, आरमार, दारूगोळ्याचें उत्पादन इत्यादि सर्व बाबतींत वाढ करण्याचा सरकारचा प्रयत्न चालू असल्याचें मुख्य सेनापति, सर रॉबर्ट कॅसल्स, ह्यांनीं नुकतेंच जाहीर केलें.

**अमेरिका स्वसंरक्षणार्थ जादा खर्च तातडीनें करणार**

युरोपांतील अलीकडच्या युद्धविषयक घडामोडी लक्षांत घेऊन अमेरिकेच्या संरक्षणार्थ सुमारें ३५० कोटि रुपयांच्या जादा खर्चाची तातडीनें मागणी प्रेसिडेंटनीं कॉंग्रेसला केली आहे.

**तुर्की भूकंप दुःखनिवारण फंड**

तुर्कस्थानांतील भूकंपामुळें निराश्रित झालेल्या लोकांच्या सहायासाठी हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयांचेकडे जमलेल्या फंडाची रकम १ कोटि, ९० लक्ष रुपयांचे वर केली आहे.

**जिलबी**

महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय झालेलें जिलबी हें पक्वान्न मूळचें महाराष्ट्रीय नव्हे; तें बाहेरून आलेलें आहे. साडेतीनशें वर्षांच्या मागच्या मराठी व संस्कृत ग्रंथांत त्याचा उल्लेख सापडतो. ह्या विषयावर निबंध भांडारकर रिसर्च इंस्टिट्यूटचे क्युरेटर, श्री. गोडे, ह्यांनीं भारत इतिहास मंडळाच्या वार्षिक संमेलनांत गेल्या आठवड्यांत वाचला.

**'बँक ऑफ महाराष्ट्र'ची डेक्कन जिमखाना शाखा**

पुणें शहराच्या पश्चिम भागांतील जनतेच्या आणि विशेषतः आपल्या आश्रयदात्यांच्या सोयीसाठीं येथील बँक ऑफ महाराष्ट्रनें आपली एक शाखा डेक्कन जिमखान्याच्या बाजूस श्री. आबासाहेब रानडे ह्यांच्या बंगल्यांत उघडली आहे.

**स्वित्सर्लंडची स्वसंरक्षणाची लढाऊ तयारी**

स्वित्सर्लंड ह्या चिमुकल्या स्वतंत्र राष्ट्रानें आपला तटस्थपणा भोंवतीं युद्धाचा वणवा पेटला असतांहि आतांपर्यंत अबाधित राखला आहे. तथापि, येईल त्या संकटास तोंड देण्याकरितां त्यानें स्वसंरक्षणाची लढाऊ तयारी ठेवली आहे. ह्या प्रीत्यर्थ तेथील सरकारनें जादा कर बसवले आहेत आणि अलीकडे वीस कोटि स्विस-फ्रँक्सचें कर्जहि काढलें आहे.

**फेडरल कोर्टाकडे अपील**

मद्रासच्या कॉंग्रेस शासित मंत्रिमंडळानें शेतकऱ्यांच्या कर्ज-निवारणाचे संबंधांत केलेला कायदा राज्यघटनेस धरून आहे असा निर्णय प्रांतिक हायकोर्टानें दिला आहे, त्याचेवर फेडरल कोर्टाकडे अपील झालें असल्याचें समजतें.

**ब्रिटननें साखर खरेदी केली**

ग्रेट ब्रिटनला लागणारी सर्व साखर तेथील सरकारानें ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, मॉरिशस, फिजी, वेस्ट इंडीज व इतर ब्रिटिश वसाहती यांचेकडून खरेदी करून टाकली आहे. हा सवदा साडेसतरा लक्ष टनांचा आहे.

**ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ७ पै व्याज**

गेल्या आठवड्यांत हिंदुस्थानसरकारच्या ट्रेझरी बिलांचे बाबतचीं दोन कोटि रुपयांचीं टेंडरें स्वीकारण्यांत आलीं. त्याचेवर द. सा. द. शे. १ रु. १ आ. ७ पै इतका व्याजाचा दर पडला.

**जी. आय. पी. रेल्वेचें उत्पन्न**

एप्रिल १ ते मे २० ह्या मुदतींत जी. आय. पी. रेल्वेस २ कोटि ३० लक्ष रुपये उत्पन्न झालें. गेल्या सालच्या ह्याच मुदतींतल्या उत्पन्नाचे मानानें हा आकडा २४ लक्षांनीं अधिक आहे.

**मुंबई सरकार पुण्यास येत नाहीं**

मुंबई सरकार नेहमीच्या प्रघातास अनुसरून पावसाळ्यांत आपलें ठाणें पुण्यांत चालू महिन्याच्या प्रारंभापासून आणणार होतें, परंतु युद्धपरिस्थितीमुळें तो बेत रहित झाला आहे.

**इंग्लंडमध्यें जादा नफ्यावरील कर शंभर टक्के**

ब्रिटिश सरकारास युद्धासाठी खर्चण्यास पैसा हवा ह्याकरितां जादा नफ्यावरील कर शंभर-टक्के करण्यांत आला आहे. म्हणजे ठराविक मर्यादेवरचा सबंध नफा सरकारी तिजोरींत घेतला जाईल.

**हिंदी कपाशीच्या पिकाचा अंदाज**

चालू हंगामांत कपाशीच्या लागवडीचें क्षेत्र ४९ लक्ष ९४ हजार एकर (संस्थानांचा आकडा १४ लक्ष, ९६ हजार) असून गेल्या वर्षाचे मानानें त्यांत १४ टक्के घट झालेली आहे. पिकाची निपज ९ लक्ष ६५ हजार गाठी इतकी (संस्थानांत २ लक्ष ९३ हजार) भरेल. गेल्या वर्षाचे मानानें येथें ८ टक्के घट आहे.

**चाळीस लक्ष रुपयांची हिंदी पोलादास मागणी**

ब्रिटिश सरकारामार्फत हिंदी पोलादास चाळीस लक्ष रुपयांची ऑर्डर आली आहे. हें पोलादी सामान इमारतीच्या बांधणीस उपयोगी पडेल असें पाहिजे आहे आणि मेसापोटेमिया व इजिप्त येथें तें पोचतें व्हावयाचें आहे.

**लढाऊ विमानांचें अमेरिकेंत उत्पादन**

दरवर्षी पन्नास हजार लढाऊ विमानें बनवण्याचा अमेरिकेनें संकल्प केला आहे. दोस्त राष्ट्रांस त्यांचा पुरवठा होईल अशी तजवीज होणार असल्याचें समजतें.

**इंग्लंडास तुर्की अंड्यांचा पुरवठा**

डेन्मार्कमधून इंग्लंडला अंडीं जाण्याचा मार्ग बंद झाल्यामुळें तुर्कस्तानमधून आतां त्यांचा बराच पुरवठा होऊं लागला आहे.

**हिंदी विमा मंडळ्यांवर कर!**

कलकत्ता येथें इंडिअन इन्शुअरन्स इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, श्री. एस. सी. रे, ह्या संस्थेच्या वार्षिक सभेचे प्रसंगीं म्हणाले कीं, विम्याच्या धंद्यास केवळ कायद्याच्या नियंत्रणाचीच अडचण नाहीं; त्यांच्या प्राप्तीवर वार्षिक कर बसवण्याचा सरकारचा विचार दिसतो.

**प्राप्तीवरील कराच्या आकारणींत घसाऱ्याचें प्रमाण**

प्राप्तीवरील कराच्या आकारणींत कारखान्यांस घसारा कोणत्या प्रमाणांत काढून टाकूं द्यावा ह्या विषयीं कारखानदारांचे प्रतिनिधी आणि हिंदुस्थान सरकारचें बोर्ड ऑफ रेव्हिन्यू ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालल्या होत्या. त्यांचा निकाल कारखानदारांस अनुकूल झाला असल्याचें समजतें.

**वृद्ध आणि तरुण**

"तरुण असणें आणि मूर्खपणा करणें ह्या गोष्टी वृद्धांनीं अनुभवलेल्या असतात; पण वृद्ध होऊन शहाणपणानें वागणें ह्या गोष्टीचा तरुणांस अनुभव नसतो"—मि. चेंबरलेन.

अनुक्रमणिका

पृष्ठ
१ विविध माहिती ... २६६
२ हिंदी बँकांचा योजिलेला कायदा ... २६७
३ सहकारी बँकांच्या हिशेब-तपासणीचा प्रश्न २६८
४ स्फुट विचार ... २६९
शेतीच्या धंद्यांत हिशोबी-पणाची आवश्यकता—श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचें मननीय भाषण—स्वदेशी सासरेस गेलें वर्ष कसें गेलें !—फ्लँडर्समधील लढाई—हिंदुस्थान सरकारची सावधगिरीची सूचना
५ शेती व जनावरांची सुधारणा ... २७१
६ गेल्या वर्षांतील हिंदी परराष्ट्रीय व्यापार ... २७१
७ खोट्या बातम्या पसरवण्याचा प्रयत्न हाणून पाडा ... ... २७२
८ निवडक बाजारभाव २७५

# अर्थ

बुधवार, ता. ५ जून, १९४०

## हिंदी बँकांचा योजिलेला कायदा

### मुख्य कलमांची छाननी

(१)

हिंदुस्थानांतील बँकांस विशेषें करून लागू पडतील अशीं कांहीं कलमें हिंदी कंपन्यांच्या कायद्यांत अलीकडे समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. तथापि, बँकांचा कारभार व्यवस्थित रीतीनें चालून ठेवीदारांच्या पैशास कोणताहि धोका येऊं नये ह्यासाठीं ह्या संस्थांच्या नियंत्रणाच्या हेतूनें स्वतंत्र कायदा केला जावा अशी सूचना अनेकवार करण्यांत आलेली होती. तो प्रश्न अलीकडे रिझर्व्ह बँकेनें हातीं घेऊन बँकांच्या कायद्याचा एक मसुदा सरकारकडे पाठविला असून त्यावर लोकमत अजमावण्याचें काम सध्या चालू आहे हें आमच्या वाचकांस माहीत आहे. त्याचप्रमाणें, ह्या मसुद्याचीं महत्त्वाचीं आणि वादग्रस्त होण्यासारखीं कलमें कोणतीं आहेत, ह्याचें विवेचनहि आम्हीं मागें केलें आहे. बँकांविषयींच्या बिलावर निरनिराळ्या संस्थांकडून सरकारकडे अभिप्राय धाडण्यांत येत आहेत. हिंदी बँकांची व्यवस्थित रीतीनें प्रगति व्हावी आणि तिला अडथळा न येतां सहाय व्हावें अशा प्रकारचाच कायदा होणें अगत्याचें आहे. विशेषतः लहान आकाराच्या बँकांचा विस्तार होण्याचे बाबतींत होऊं घातलेल्या कायद्याची निष्कारण अडचण येतां कामा नये, ह्या दृष्टीनें प्रसिद्ध झालेल्या बिलाचा विचार होणें आवश्यक आहे. ह्या हेतूनें बिलाविषयीं व्यक्त झालेल्या अभिप्रायांचा आणि त्याच्या मुख्याच्या कलमांवर करण्यांत आलेल्या टीकेचा गोषवारा येथें देण्यांत येत आहे.

बिलाच्या महत्त्वाच्या व वादविषयक कलमांमधील ७ वें कलम प्रथम विचारांत घेऊं. ह्या कलमांत बँकांचें किमान भाग भांडवल किती असलें पाहिजे हें सांगितलें आहे. कंपनी कायद्याप्रमाणें पन्नास हजार रुपये भरलेलें भांडवल असल्यावांचून कोणतीहि बँक व्यवहार करूं शकत नाहीं. बिलाच्या ७ व्या कलमांत भागांचें भांडवल व रिझर्व्ह मिळून एक लक्ष रुपयांची मर्यादा घालण्यांत आली आहे. बँक मुंबई किंवा कलकत्ता ह्या शहरांत व्यवहार करीत असेल तर ही मर्यादा ५ लक्ष रुपये आहे आणि एक लक्ष लोकसंख्येच्या प्रत्येक शहरांत ती २ लक्ष रुपये आहे. बँक स्वतःचा प्रांत किंवा संस्थान यांच्या बाहेर व्यवहार करील तर भागांच्या भांडवलाची मर्यादा २० लक्ष रुपये होईल. कोणत्याहि बँकेस आपला व्यवहार नीट चालवून घेतांचा तरी नफा मिळवावयाचा असेल तर तिचें भागांचें भांडवल व रिझर्व्ह मिळून निदान एक लक्ष रुपयांची रकम भरली पाहिजे असा ह्या मर्यादेबाबतचा रिझर्व्ह बँकेचा युक्तिवाद आहे. त्यास असें उत्तर देण्यांत येत आहे कीं कंपनी कायद्यांतली सध्याची ५० हजार रुपयांची मर्यादा पुरेशी आहे. हिंदुस्थानच्या सध्याच्या परिस्थितींत मध्यम आकाराच्या बँकांचा विस्तार होण्याची आवश्यकता सर्वमान्य झाली आहे आणि एक लक्षांचें भागांचें भांडवल असल्यावांचून बँक चालू नये किंवा निघूं नये असा आग्रह धरल्यानें इच्छित प्रगतीच्या मार्गांत विघ्न उत्पन्न केल्यासारखें होणार आहे. कांहीं टीकाकारांनीं ५० हजार भांडवल असलेली बँक चांगल्या रीतीनें कशी चालू शकेल हें आकड्यांनिशीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या एका टीकाकारानें असें म्हटलें आहे कीं, कांहीं बँका संकटांत आल्या आहेत ह्याचें कारण त्यांचें भाग भांडवल कमी होतें हें नव्हे. मोठें भांडवल असून इतर कारणांमुळें त्यांचेवर आपत्ति ओढवलेली आहे. भागांच्या भांडवलाच्या रकमेस मर्यादा घालण्याचे ऐवजी हें भांडवल आणि बँकेनें घ्यावयाच्या ठेवी ह्यांचें परस्परप्रमाण निश्चित करणें अधिक युक्त होईल अशी त्या टीकाकाराची सूचना आहे. मोठ्या बँका मोठ्या धंदेवाल्यांची सोय पहातील, पण लहान प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या व मध्यम स्थितींतल्या लोकांच्या सोयीसाठीं लहान बँकांची आवश्यकता आहे असें त्याचें म्हणणें आहे. एक लक्ष रुपये भांडवलाची मर्यादा घालण्यांत आली असतां आपल्या भांडवलाची रकम भल्या बुऱ्या मार्गानें वाढवण्याची धडपड बँका करतील आणि त्यांचेमध्यें अनिष्ट चढाओढ लागून तिचे परिणाम अनिष्ट होतील असें तिसरा एक टीकाकार म्हणतो. जिल्ह्यांच्या आणि विशेषतः तालुक्यांच्या गावीं बँका चालणें देशाच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें जर अगत्याचें आहे तर भांडवलाची मर्यादा एक लक्ष रुपयांपर्यंत चढवून हा विस्तार अशक्य किंवा कठिण करण्यांत काय अर्थ आहे ? अशी त्यांची पृच्छा आहे. हिंदी बँकिंगची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या मध्यवर्ती कमिटीनें एक लक्ष रुपयांची आतां सुचवण्यांत आलेली चढीची मर्यादा नापसंत केलेली आहे, ह्याची आठवण एका लेखकानें ह्या संबंधांत करून दिली आहे. त्या कमिटीच्या मतानें असली मर्यादा अव्यवहार्यहि आहे. भिन्नभिन्न ठिकाणांची आणि प्रांतांची परिस्थिति निरनिराळी असते आणि त्यांच्या गरजाहि एकच प्रकारच्या असत नाहींत; आणि लहान व मध्यम आकाराच्या बँकांची आज देशास आवश्यकता आहे. ह्यास्तव त्यांस भांडवलाची मोठी मर्यादा घालून बँकांची वाढ खुंटवणें चांगलें नाहीं, असा हा युक्तिवाद आहे.

लहान-मोठ्या शहरांत हिंदी बँकांच्या शाखांचें व कचेऱ्यांचें जाळें पसरून सामान्य जनतेस बचत करण्याची सवय लावून छोट्या-मोठ्या व्यापाऱ्यांस व धंदेवाल्यांस त्यांचा फायदा मिळाला पाहिजे ह्या अपेक्षेस नियोजित कायद्याचें ७ वें कलम बाधक होणार आहे, हा त्यावर मुख्य आक्षेप आहे. मुंबई व कलकत्ता ह्या शहरांतील आज अस्तित्वांत असलेल्या मोठ्या बँकांस ह्या

कलमाचे योगानें मक्तेदारीचा हक्कच जणूं काय बहाल केल्यासारखें होणार आहे. जिल्ह्यांतील कोणत्याही बँकेस मुंबईमध्यें आपली शाखा काढून व्यवहार वाढवणें अशक्य होईल आणि त्याचप्रमाणें दुसऱ्या लहान-मोठ्या व्यापाराच्या केंद्रांमध्यें धंदा चालू करतां येणार नाहीं. मोठ्या शहरांतल्या मोठ्या प्रमाणावरील बँका हिंदी लोकांच्या सत्तेखाली चाललेल्या नसल्यानें बँकिंगच्या शुद्ध हिंदी व्यवसायाचा विस्तार नवीन कायद्यामुळें खुंटल्यावांचून रहावयाचा नाहीं. कांहीं प्रांतांतील लहान बँकांस, दोन वर्षांच्या मुदतींत आपलें भांडवल ठराविक मर्यादेपर्यंत वाढवण्याची संधी कायदा देणार आहे, तिचा फायदा घेतां येणार नाहीं आणि त्या बंद पडतील किंवा एकीकरणाचा प्रयत्न करतील. लहान आकाराच्या बँकांचा योग्य योगक्षेम कसा चालेल ह्याकडे सरकारानें लक्ष पुरवून त्यांस सवलती व उत्तेजन दिलें पाहिजे; नियोजित कायदा ह्याच्या विरुद्ध दिशेनें जाऊं पहात आहे अशी त्यावर कित्येकांनीं टीका केली आहे. प्रत्येक बँकेच्या मागें एक लक्ष रुपये भांडवलाची आणि शाखांच्या मानानें आणखी अनेक लक्षांचें भांडवल असण्याची अट कायद्याच्या मसुद्यांत आहे ती व्यावहारिक दृष्ट्या कितीशी आवश्यक आणि इष्ट आहे हा येथें मुख्य प्रश्न आहे. ही नुसती तत्त्वाची बाब नसून प्रत्यक्ष अनुभवाची, व्यवहाराची व आर्थिक गरजेची आहे. तरी बँकांच्या धंद्याशी ज्यांचा संबंध आहे अशा मंडळींनीं आपले अनुभव व अपेक्षा ह्या प्रसंगीं स्पष्टपणें पुढें मांडणें अगत्याचें आहे.

---

## सहकारी बँकांच्या हिशेबतपासणीचा प्रश्न

सहकारी बँकांच्या हिशेबाची तपासणी कायद्याप्रमाणें रजिस्ट्रारनें नेमलेल्या किंवा मान्य केलेल्या तज्ञ तपासनिसाकडून व्हावी लागते. ही तपासणी मोफत तर नसतेच, पण बँकांस मोठ्या खर्चाची वाटते. बहुतेक बँकांस आपल्या हिशेबाच्या चालू तपासणीसाठी माणूस नेमावा लागून त्याचा खर्च सोसावा लागतो आणि शिवाय सरकारी तपासणीबद्दल पैसे द्यावे लागतात. लायक पण बिन सरकारी तपासनिसांकडून हें काम करून घेतल्यास सरकारास द्याव्या लागणाऱ्या देण्यांत बचत होईल ह्या दृष्टीनें रजिस्ट्रारनीं मान्य केलेल्या लायक माणसांची योजना करण्यास सरकारनें परवानगी द्यावी अशी सहकारी बँकांची मागणी होती. भणसाळी-मेथा रिपोर्टांत ह्या संबंधांत अनुकूल शिफारस करण्यांत आली होती आणि तिचा विचार प्रांतिक सरकार करीत होतें. सरकारचा निर्णय आतां प्रसिद्ध झाला आहे आणि त्यांत वरील मागणी व शिफारस ह्यांचा स्वीकार बऱ्याच अंशीं करण्यांत आला आहे. भणसाळी-मेथा रिपोर्टांत खालील बँकांचे व सोसायट्यांचे संबंधांत धंदेवाल्या हिशेबतपासनिसांची नेमणूक होण्यास मुभा असावी असें सुचवलेलें होतें:—( १ ) अ व ब वर्गांतील मध्यवर्ती बँका ( त्यांच्या कारभाराच्या तपासणीची व्यवस्था त्यांच्या मध्यवर्ती मंडळाकडून होत असेल तर ); ( २ ) दोन हजार रुपये भागभांडवलाच्या अ व ब वर्गांतील अर्बन बँका व मुंबई शहरांतील सहकारी सोसायट्या; ( ३ ) कमूमर्स सोसायट्या (त्यांच्या हिशेबतपासणीची स्वतंत्र व्यवस्था नसेल तर ); ( ४ ) अ व ब वर्गांतील हाउसिंग सोसायट्या ( त्यांना सरकारचें कांहीं देणें शिल्लक नसेल तर ); ( ५ ) अ व ब वर्गांतल्या वीस हजार रुपयांवरच्या भागभांडवलाच्या सेल सोसायट्या ( हिशेबतपासणींत निर्दिष्ट केलेले दोष दूर होण्याची खबरदारी घेईल असें नियंत्रणमंडळ असेल तर ). वरीलपैकी ( २ ), ( ३ ) व ( ४ ) ह्या कलमांतील सूचना सरकारनें स्वतःस मान्य असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. सरकारी हिशेबतपासनिसांनीं दर तीन वर्षांतून एकदा ह्या संस्थांच्या हिशेबांच्या झालेल्या तपासणीची पुन्हां तपासणी केली पाहिजे अशी अट मात्र ह्या मंजुरीस जोडण्यांत आली आहे. सहकारी कायद्याच्या २२ व्या कलमास अनुसरून रजिस्ट्रारनीं धंदेवाल्या हिशेबतपासनिसांची एक यादी तयार करून सरकारकडे मंजुरीसाठी पाठवावी असें फर्माविण्यांत आलें आहे. वरील ( १ ) व ( ५ ) ह्या कलमांतील संस्थांचे संबंधांत तेथें नमूद केलेल्या अटी पुऱ्या झाल्या म्हणजे सरकारचा निर्णय देण्यांत येईल असें सरकारी ठरावांत म्हटलें आहे. बँकांची एक मध्यवर्ती संस्था आतां स्थापन झालेली असल्यानें ( १ ) कलमांतील अट पुरी झाली आहे असें मानण्यास हरकत असूं नये आणि त्यांत समाविष्ट असलेल्या ( सेंट्रल ) बँकांस इतर संस्थांस दिलेली हिशेबतपासनिसांचे बाबतींतील सवलत लवकर मिळेल अशी आशा आहे.

प्रत्येक सहकारी संस्थेची हिशेबतपासणी दरवर्षी करून घेण्याची जबाबदारी कायद्यानें सरकारावर म्हणजे रजिस्ट्रारवर टाकली आहे. पण सेंट्रल बँका व मोठ्या अर्बन बँका ह्यांचे बाबतींत ती वेळेवर पार पडणें नेहमीच सोपें नसतें आणि ह्या संस्थांच्या कारभाराचे दृष्टीनें सोयीचेंहि नसतें. सरकारी हिशेबतपासनिसांच्या ऐवजी धंदेवाल्या लायक इसमांकडून सदरहू काम करून घेतल्यास तें कमी खर्चाचें व दोन्ही पक्षीं सोयीचें होणार आहे. ह्या दृष्टीनें मुंबई सरकारनें आतां मान्य केलेली योजना अभिनंदनीय आहे. संघटित व सुव्यवस्थित सहकारी संस्थांवर विश्वास टाकण्याची सरकारची प्रवृत्ति ह्यांत दिसून येते, ती उदारमतवादित्वाची व प्रगतीची निदर्शक आहे. सहकारी संस्थांचें, विशेषतः सेंट्रल व अर्बन बँकांचें, संघटन आलीकडे झालें आहे; आणि सहविचारानें आपले प्रश्न सोडवण्याचें जें धोरण त्यांनीं अंगिकारलें आहे, त्याशी सुसंगत अशीच ही नवी व्यवस्था आहे. तिचें रहस्य सहकारी बँका ओळखतील आणि त्याप्रमाणें शिस्तीनें व जुटीनें आपल्या जबाबदाऱ्या त्या पार पाडतील अशी स्वाभाविक अपेक्षा आहे. सेंट्रल आणि अर्बन बँकांची असोसिएशन स्थापन होऊन तिचें काम जोरानें चालू आहे. ह्या असोसिएशनचा सल्ला वेळोवेळ घेऊन तिच्यावर जबाबदारी व विश्वास टाकण्याचें रजिस्ट्रारनीं अभिवचन दिलें होतें, त्याची फलद्रूपता अनुभवास येत आहे ही उत्तेजनकारक गोष्ट आहे. बँकांची संपात्तिक स्थिति दर्शवणारी माहिती तक्त्यांच्या स्वरूपांत दर तीन महिन्यांनीं सरकारी गॅझेटामध्यें प्रसिद्ध होत असते, ती बँकांच्या असोसिएशनच्या विद्यमानें प्रसिद्ध होण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे आणि ह्यासाठी सदरहु माहिती बँकांनीं असोसिएशनकडे पाठवावी असें रजिस्ट्रारनीं त्यांस सुचवलें आहे असें समजतें. प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचें त्रैमासिक ह्या माहितीच्या प्रसिद्धीस सोयीचें होणार असल्यानें त्याचा उपयोग ह्या कामीं करण्यांत येणार आहे. ह्या सर्व बाबी सहकारी बँकांचें संघटन निकट व कार्यक्षम होत चाललें आहे ह्याची साक्ष पटवीत आहेत.

---

## स्फुट विचार

### शेतीच्या धंद्यांत हिशोबीपणाची आवश्यकता

धंदा लहान असो की मोठा असो, दुकानदारीचा असो की कारखानदारीचा असो, त्यामध्यें हिशेबीपणा असणें आवश्यक आहे. व्यवसाय मोठा असेल आणि त्यांत म्हणण्यासारखा नफा उरत असेल तरच हिशेब ठेवण्यांत अर्थ आहे, कसाबसा धंदा चालवणारास हिशेबाचा काय उपयोग आहे अशी कित्येकांची कल्पना असते, पण ती चुकीची आहे. उलट, नफ्यास वाव जेवढा कमी, तेवढी काटकसरीची जरूर अधिक आणि म्हणूनच लहान धंद्यांस हिशेबाचें महत्त्व विशेष आहे. आपलें धंद्यांतलें भांडवल सुरक्षित आहे किंवा नाहीं आणि त्यांत निवळ नफा आपणांस किती होतो, हें समजल्यावांचून कोणासहि आपल्या उद्योगाची मांडणी नीट करतां येणार नाहीं. हिंदी शेतकऱ्याच्या धंद्यांत हिशोबीपणाचा पूर्ण अभाव आहे असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. ह्या धंद्याची परिस्थितीच अशी आहे आणि तो चालवणारांचा मागसलेपणा व अज्ञान ह्यांची एवढी मोठी अडचण मार्गांत आहे कीं शेतकऱ्यांनीं हिशेबीपणानें वागावें व व्यवहार करावे अशी अपेक्षा करणें कठिण झालें आहे. तथापि, हिंदी शेतकऱ्यांनीं सोप्या पद्धतीनें स्वतःचे हिशेब ठेवण्याचें महत्त्व दिवसानुदिवस अधिकाधिक पटत आहे. ह्या मार्गांतलें पहिलें पाऊल म्हणजे शेतीच्या धंद्यांत निरनिराळ्या परिस्थितींत होणाऱ्या उत्पन्न-खर्चाची चौकशी करून तिच्यामधून निघणाऱ्या आकड्यांस व अनुमानांस प्रसिद्धि देणें हें होय. पंजाबमध्यें जिल्हानिहाय अशा चौकशा झाल्या असून शेतकऱ्यांच्या उपयोगासाठी सोप्या हिशेबाची मांडणी तयार करतां येण्याची शक्यता सिद्ध झाली आहे. शेतमालाच्या विक्रीच्या संबंधांत पिकें करण्याचा शेतकऱ्यांस येणारा खर्च व त्यांपासून मिळणारें उत्पन्न ह्याची छाननी विस्तृत प्रमाणांत करण्यांत आली आहे. मुंबई इलाख्यांत अशा प्रकारचे प्रयत्न झाले असून त्यांची माहिती पुस्तकरूपानें प्रसिद्धहि झाली आहे. तथापि, शेतकऱ्याच्या हिशेबाची माहिती त्यास करून देऊन त्याच्या व्यवहारांत हिशेबीपणा उत्पन्न करण्याचें व्यावहारिक कार्य अजून व्हावयाचें आहे. ग्रामसुधारणेच्या कार्यक्रमांत त्याचा अंतर्भाव होण्यासारखा आहे. हें शैक्षणिक काम आहे आणि तें परिश्रमपूर्वक आणि नेटानें झालें तरच त्यांत यश मिळेल हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपला कौटुंबिक खर्च मिळकतीच्या मर्यादेंत आहे कीं नाहीं, आपल्या कर्जाची परिस्थिति काय आहे, त्याचा बोजा मिळकतीमधून कसा कमी करतां येईल, काटकसर कोठें करतां येईल इत्यादि प्रश्नांचा विचार करण्याची शक्ति व बुद्धि शेतकरीवर्गांत निर्माण करणें हा त्यास हिशेबीपणा शिकवण्याचा मुख्य उद्देश असला पाहिजे, आणि त्याच्या हिशेबाची पद्धति अत्यंत सोपी असली पाहिजे.

---

### श्री. वैकुंठराय मेथा ह्यांचें मननीय भाषण

दक्षिण कॅनरा जिल्ह्याच्या सहकारी परिषदेचे अध्यक्ष ह्या नात्यानें श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं गेल्या आठवड्यांत भाषण केलें, त्यांतील महत्त्वाच्या मुद्यांचा उल्लेख येथें करणें अवश्यक आहे. आर्थिक मंदीनें सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलें असून हिंदुस्थानांत अगदी अलीकडे ह्या संबंधांतील आपल्या कर्तव्यास प्रांतिक सरकारें जागीं झालीं आहेत. शेतकऱ्याच्या आपत्तींत केवळ तात्पुरतें सहाय दिल्यानें काम भागावयाचें नाहीं, त्याच्या धंद्यांत व जीवनांत कायमच्या स्वरूपाची सुधारणा होणें अगत्याचें आहे, अशा आशयाचा प्रस्ताव करून श्री. वैकुंठराय सहकारी चळवळ अपेक्षेप्रमाणें यशस्वी न होण्याच्या कारणांकडे वळले. सहकारी संस्थांचें सभासदत्व वैयक्तिक खुषीचें असतें आणि खेडेगावांतील सर्वच लोकांस त्याचा फायदा घेतां येतो असें नाहीं, ह्या कारणानें सहकारी चळवळीचा विस्तार मर्यादित असतो. तसेंच, शेतकऱ्यांस दुसरीकडून वाटेल तेव्हां पैसा कर्जाऊ मिळूं शकतो, तसा सहकारी पतपेढीपासून मिळूं शकत नाहीं. हें नियंत्रण आवश्यक असलें तरी तें सहकारी संस्थांच्या प्रगतीस आडथळा आणतें. पतपेढ्यांनीं आपलीं बँकिंग मंडळें ( बँकिंग युनिअन्स ) स्थापावीं ह्या सूचनेस मद्रास प्रांतांत लोकमत अनुकूल नाहीं. ह्या स्थितींत सेंट्रल बँकांनीं शक्य तेथें आपल्या शाखा स्थापून पतपेढ्यांशीं संबंध दृढ करावा असें श्री. वैकुंठराय ह्यांनीं सुचवलें. शेतीच्या सुधारणेबाबत शास्त्रीय शोध लावण्यांत येतात, ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोंचत नाहींत. ह्या कामीं सहकारी संस्थांचा उपयोग करून घेणें आवश्यक आहे असें त्यांचें म्हणणें आहे. ह्यानंतर खेडेगावी धंद्यांचें पुनरुज्जीवन होण्याचें महत्त्व त्यांनीं प्रतिपादलें आणि सरकारनें ह्या कामीं सहाय दिलें पाहिजे असें त्यांनीं आपलें मत दिलें. बँकांचे संबंधांत कायदा करण्याचें घाटत आहे, तो सहकारी चळवळीस लागू होणार नसला तरी बँकांच्या व्यवहारांचे बाबतींतली त्यांतील व्यवस्था सहकारी बँकांनीं उचलली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांनीं आर्थिक योजनात्मक धोरणाविषयीं काढलेल्या उद्गारांचा उल्लेख करून श्री. वैकुंठराय म्हणाले कीं, आर्थिक क्षेत्रांत लोकशाही कोठें असेल तर ती सहकारी संघटनेंत आहे. व्यक्ति आणि समाज ह्यांच्या हितसंबंधांतला विरोध दूर करून आर्थिक समता व न्याय स्थापित करण्याचें सामर्थ्य सहकारांत आहे. ह्या दृढविश्वासानें सहकारी कार्यकर्ते आपलें काम करीत आहेत असें शेवटीं सांगून त्यांनीं आपलें भाषण संपवलें. कांहीं युरोपियन राष्ट्रांत व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश होऊन सर्वाधिकाऱ्यांच्या हातांत राजकीय व आर्थिक सत्ता गेली आहे, अशा काळीं व्यक्तित्व आणि समाजसत्ता ह्यांचा मेळ घालणाऱ्या सहकारी तत्त्वाचें रहस्य त्यांनीं स्पष्ट करून सांगितलें, तें ध्यानांत बाळगण्यासारखें आहे.

---

### स्वदेशी साखरेस गेलें वर्ष कसें गेलें ?

नोव्हेंबर ते ऑक्टोबर हें साखरेचें वर्ष गणण्यांत येतें. नोव्हेंबर, १९३८ ते ऑक्टोबर १९३९ ह्या वर्षांतले हिंदी साखरेविषयींचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, ते आम्हीं येथें देत आहों. ह्या सालांतलें हिंदी साखरेचें उत्पादन देशाच्या मामुली मागणीच्या मानानें तीन लक्ष टनांनीं कमी होतें. ऑक्टोबर १९३८ अखेरच्या बारा महिन्यांत जेवढी स्वदेशी साखर तयार झाली होती, तिच्यापेक्षा ३० टक्क्यांनीं कमी इतकें उत्पादन १९३८-३९ ह्या हंगामांत झालें. १९३७-३८ ह्या वर्षांत हिंदी साखरेच्या कारखान्यांत १०,७२,९०० टन साखर बनवली गेली होती, पण १९३८-३९ मध्यें उत्पादन फक्त ७,६६,६०० टन एवढेंच झालें. देशाची मागणी व देशी साखरेचें उत्पादन ह्यांमध्यें याप्रमाणें खिंड पडली,

ती जाव्हा साखरेच्या आयातीनें भरून काढली. १९३७-३८ मध्यें याप्रमाणें १३,७१५ टन साखर बाहेरून आली होती, ती १९३८-३९ सालीं ३२,७१५ टनांपर्यंत चढली. हिंदुस्थानांत साखरेचा एकूण खप १९३८-३९ सालांत १०,८३,००० टन झाला असावा असा अंदाज आहे. त्याच्या पूर्वीच्या सालांतला खपाचा आकडा ११,५०,००० टन एवढा होता. १९३६-३७ मध्येंहि खप मोठा झाला होता आणि त्याचा आकडा ११,६७,००० टन असा होता. १९३७-३८ मध्यें दर माणशीं साखरेचा खप ७६ पौंड होता, तो १९३८-३९ सालीं ५६ पौंड झाला. १९३८-३९ सालीं देशी साखरेच्या उत्पादनांत मोठी घट पडल्या कारणानें तिची किंमत चढली. श्रेष्ठ प्रतीच्या साखरेचा भाव १९३८ च्या नोव्हेंबरांत दर मणी सरासरीनें ९ रु. २ आ. ५ पै होता, तो १९३९ च्या ऑक्टोबरांत दर मणी १० रु. १५ आ. १० पै पर्यंत चढला. चालू हंगामांतलें उत्पादन मोठें होईल असा अंदाज आहे. तथापि, अजून किंमतींत विशेष घट झालेली दिसत नाहीं. उत्पादन व खप ह्यांचेमध्यें पडणाऱ्या अंतरामुळें भाव थोडे खालीं येतील असें वाटण्यास जागा आहे.

### फ्लँडर्समधील लढाई

गेल्या आठवड्यांतील युद्धक्षेत्रांतली अत्यंत महत्त्वाची बातमी म्हटली म्हणजे बेल्जमच्या राजांनीं आपल्या सैनिकांस शस्त्रें खालीं ठेवण्यास लावून स्वतः शत्रूच्या स्वाधीन होण्याचा केलेला अनपेक्षित बनाव ह्या विषयींची होय. बेल्जममध्यें फ्रेंच, इंग्लिश व बेल्जम फौजा जर्मनांचा प्रतिकार करीत होत्या आणि जरूरीप्रमाणें व्यवस्थितपणानें पीछेहाट करून सॅाम नदीच्या बाजूस फ्रेंच सेनापतीस तिकडील सैन्याची पुनर्घटना करण्यास वेळ व संधि देत होत्या. एकाएकी बेल्जम राजा जर्मनांस शरण गेल्यानें दोस्त राष्ट्रांच्या फौजांची फळी तुटून त्यांचा समुद्र काठच्या चिंचोळ्या पट्टींत कोंडमारा करण्यास शत्रूस सहाय मिळालें. जर्मनांनीं बेल्जमवर स्वारी केली तेव्हां बेल्जम सरकारानें दोस्त राष्ट्रांची मदत मागितली आणि इंग्लिश व फ्रेंच फौजा त्याच्या मदतीस धावून गेल्या. अशा परिस्थितींत आपल्या दोस्तांस न कळवतां बेल्जमच्या राजानें आपल्या तीन चार लाख फौजेस शत्रूस शरण जाण्यास सांगावें आणि ब्रिटिश व फ्रेंच सैन्यास संकटांत टाकावें हा कृतघ्नपणाचा कळस आहे असें बेल्जमच्या प्रधानमंडळानें जाहीर केलें आहे. आपल्या राजास मंत्रिमंडळाच्या व जनतेच्या संमतीवांचून लढाई बंद करण्याचा अधिकार नाहीं आणि ती आपण दोस्त राष्ट्रांच्या सहायानें चालू ठेवणार असा दृढनिश्चय त्या मंत्रिमंडळानें जाहीर केला आहे. बेल्जमच्या राजाच्या विश्वासघातामुळें त्या देशाच्या पश्चिम किनाऱ्यालगत लढत असलेल्या ब्रिटिश फौजेची अवस्था अत्यंत कठिण होऊन गेली. उत्तर, दक्षिण व पूर्व ह्या दिशांनीं जर्मन फौजांनीं त्यांचेवर लगट केली आणि डंकर्कच्या बंदरामधून त्यांनीं इंग्लंडला परत जाऊं नये म्हणून हवेंतून गोळ्यांचा तिच्यावर सारखा वर्षाव केला. ह्याप्रमाणें कचाट्यांत सांपडलेली ब्रिटिश फौज मोठ्या शिताफीनें निसटून इंग्लंडला परत गेली आहे आणि जात आहे. जर्मन फौजा आणि विमानें ह्या हालचालींस कमालीचा विरोध करीत असतां ब्रिटिश लढाऊ जहाजें व विमानें ह्यांच्या संरक्षणाखालीं दोस्त राष्ट्रांचे सैनिक आपली सुटका करून घेत आहेत. ह्या कामीं ब्रिटिश लढाऊ विमानांनीं आणि आरमारानें केलेली कामगिरी वाखाणण्यासारखी आहे. त्यांनीं ब्रिटिश फौजेस चिंबींत पकडण्याचा हिटलरचा बेत हाणून पाडला आहे.

### हिंदुस्थान सरकारची सावधगिरीविषयक सूचना

युद्ध कालांत, विशेषतः परिणामकारक अशा निकराच्या लढाया चालू असतां अनेक अफवा उठतात आणि गप्पा हवेमध्यें पसरतात. अलीकडे ब्रिटिश पार्लमेंटानें आपल्या सरकारास नागरिकांचें जीवित व मालमत्ता ह्यांचे संबंधानें विस्तृत अधिकार, जर्मनीचा हल्ला आला तर त्याचा यशस्वी रीतीनें प्रतिकार करतां यावा ह्या हेतूनें दिले आहेत. संध्याचा आणीबाणीचा प्रसंग लक्षांत घेऊन आपलें स्वातंत्र्य व मालमत्ता ह्यांचें नियंत्रण करणाऱ्या कायद्यास ब्रिटिश जनतेनें खुषीनें संमति दिली आहे. ग्रेटब्रिटनचें जर्मनीसारख्या शत्रूपासून रक्षण होण्यास असला जालीम उपाय योजणें अपरिहार्य आहे अशी ब्रिटिश लोकांची खात्री झाली आहे. पण ग्रेटब्रिटनमधील ह्या कायद्याचा हिंदुस्थानांतील परिस्थितीशीं कांहीं संबंध नाहीं. असें असतां हिंदुस्थान सरकारहि खाजगी मालमत्ता मालकांकडून काढून घेण्याचा कायदा करणार आहे अशा अफवा ह्या देशांत उठल्या आहेत. त्यांचे संबंधांत त्या सरकारनें एक पत्रक काढून ह्या व असल्या दुसऱ्या गप्पा सर्वस्वी निराधार असल्याविषयीं जनतेची खातरजमा केली आहे. कांहीं अपमतलबी लोक असल्या अफवा उठवीत असतात आणि त्यांचेवर भोळ्या व अडाणी लोकांचा विश्वास बसण्याचा संभव असतो. आपली मालमत्ता व आपला पैसा धोक्यांत येणार ह्या खुळ्या समजुतीनें कांहीं वेडे लोक सरकारी रोख्यांतले व बँकांतले पैसे मोकळे करून घेण्यास प्रवृत्त होतात आणि स्वतःवर निष्कारण नुकसान ओढवून घेतात. हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केलेल्या पत्रकाची माहिती सर्व लोकांस होणें अगत्याचें आहे. कोणीहि हवेंतील गप्पांनीं फसूं नये, आणि सरकारच्या काल्पनिक धोरणाबाबत गैरसमज करून घेऊं नये. दुसऱ्याच्या अडाणीपणाचा फायदा घेऊं इच्छिणारे कांहीं लोक खोट्या अफवा पसरवतात. त्यांचेपासून सावध रहाणें आवश्यक आहे.

### फ्लँडर्समध्यें दोस्त राष्ट्रांची मर्दुमकी

फ्लँडर्समध्यें ब्रिटिश फौजेस कचाट्यांत धरण्याचा जर्मनीनें शिकस्तीचा प्रयत्न केला पण तो विफल करण्यांत आला. जर्मनीच्या चिमट्यांतून दोस्त राष्ट्रांच्या फौजा शौर्यानें व शिताफीनें निसटल्या आणि इंग्लंडला सुखरूप पोहोंचल्या. ह्या कामीं ब्रिटिश आरमार आणि विमानें ह्यांनीं केलेल्या मर्दुमकीची चोहोंकडे वाहवा केली जात आहे.

### चाळीशी उलटली तरी कार्यक्षम

माणसाची चाळीशी उलटली म्हणजे त्याच्या हातून तडफेनें काम होऊं शकत नाहीं ही कल्पना खरी नसल्याचें इंग्लंडांत व अमेरिकेमध्यें झालेल्या शास्त्रीय चौकशीवरून निश्चित अनुमान काढण्यांत आलें आहे. पन्नास-पंचावन वर्षांचीं माणसें धंद्यांत तरुणांपेक्षाहि अधिक बाकबगार व उपयुक्त असतात, असें व्यावहारिक अनुभवावरून सिद्ध झालें आहे.

### विनातिकिटाचा रेल्वे प्रवास

तिकिटावांचून, कमी तिकिटानें किंवा भलत्या तिकिटावर हिंदी रेल्वेजमध्यें प्रवास करतांना सांपडलेल्या उतारूंची संख्या दर वर्षी अजमासें ९५ लक्ष भरते. ह्या चोयानें रेल्वेजना २० कोटि रुपयांच्यावर चूड येते.

## शेती व जनावरांची सुधारणा

### जळगांव तालुका शेतकीसभेचें कार्य

गेल्या आठवड्यांत जळगांव तालुका शेतकीसुधारणा सभेची वार्षिक सभा मे. बूथ, कलेक्टर जळगांव, यांचे अध्यक्षतेखाली भरली होती. सभेस बरेच शेतकरी समासद हजर होते.

१९३९-४० सालामध्यें शेतकी सभेनें केलेल्या कार्याचा वार्षिक रिपोर्ट मंजूर करण्यांत आला. त्याचप्रमाणें, गेल्या सालचा जमाखर्चहि पास झाला. पुढील सालाकरितां श्री. त्र्यंबकराव बापूराव भोयटे हे प्रेसिडेंट व श्री. दोघू गरबड पाटील हे व्हा. प्रेसिडेंट म्हणून निवडले गेले. त्याचप्रमाणें. श्री. चित्रे वकील व श्री. सावंत वकील यांची सेक्रेटरी म्हणून निवड करण्यांत आली. याशिवाय ११ समासदांची मॅनेजिंग कमेटी निवडण्यांत आली.

१९४०-४१ सालचा शेती व जनावरें सुधारण्याचा कार्यक्रमही आखण्यांत आला. सभेमध्यें एकूण एकोणवीस पाटील, तलाठी व चेअरमन, सेक्रेटरी यांना शेतकीसभेचें काम उत्तम प्रकारें केलेबद्दल बक्षिसें वाटण्यांत आलीं. हीं सर्व बक्षिसें पागोटीं व जरीचे पटके वगैरेंच्या रूपानें देण्यांत आलीं. ह्याशिवाय आयत्या वेळेचा विषय म्हणून गिलिगन कॅटलफॉर्मचे मॅनेजर, श्री. डी. जी. पाटील, यांच्या पगारांत बढती देण्यांत आली.

अध्यक्ष मे. बूथ यांचे आभार मानल्यावर सभेचा कार्यक्रम पार पडला.

सभेच्या कामाचा अहवाल:—गेलीं तीस वर्षें ही असोशिएशन आपलें काम जोरांत करीत आहे व तिनें आपला "अ" वर्ग १२ वर्षे कायम ठेविला आहे. अहवालाचे सालीं या सभेनें जळगांव तालुक्यांत उत्तम तऱ्हेचें बीं-बियाणें व कलमें पुरविण्याचा व शेतीस लागणारे निरनिराळ्या प्रकारचे नांगर वगैरे औतें पुरविण्याचा प्रयत्न केला. जरिला नांवाचें नवीन कपाशीचें बीं पुरविण्यांत आलें व यंदा तालुक्यांत २०,००० एकरांची जरिलाची लागवड झाली व सभेला अशी उमेद आहे कीं दोन वर्षांत सबंध तालुका जरिला कपाशीखाली येईल.

न्यू दिल्ली येथें दरवर्षी भरणाऱ्या अखिल भारतीय जनावरांच्या प्रदर्शनामध्यें या असोसिएशननें चालविलेल्या गिलिगन कॅटल फार्मवरील जनावरें यंदा पाठविण्यांत आलीं. त्यांपैकी कमळया नांवाचे सांढास चॅलेंज कप, नेमाडी जातींतील सर्वांत उत्तम जनावर म्हणून इंदूर महाराजांनीं ठेवलेला ५०० रुपये किंमतीचा कप बक्षिस मिळाला असून एकूण चार जनावरांना दोन पहिलीं व दोन दुसरीं अशीं ३२५ रु. चीं रोख किंमतीचीं बक्षिसें मिळालीं. दर वर्षी या शोमध्यें गिलिगन फार्मचे जनावरांना बक्षिसें मिळालीं आहेत.

रिपोर्टाचे सालीं संस्थेनें चालविलेल्या गिलिगन फार्मवरून नेमाडी जातीचे २९ वळू तालुक्यांतील १८ गांवीं प्रिमियम बुल पद्धतीनें ठेविले व त्यांचेकडून यंदा २४६ गाई काढविल्या. या सर्व वळूंवर संस्थेची देखरेख असते.

याशिवाय गिलिगन फार्मवर एक व असोसिएशनचे ऑफिसचे समोर एक असे दोन दोन पोल्ट्री फार्म चालविण्यांत येत आहेत. या फार्ममध्यें लेगहार्न व र्‍होड आयलंड रेड जातीचे चांगले पक्षी ठेवण्यांत आले असून शेतकऱ्यांना कोंबडीं पाळण्याचा हुद्यम धंदा किती फायदेशीर आहे हें दाखविण्याकरितांच सदरहू फार्म चालविलेले आहेत. यंदाचे सालीं ११,१२५ अंडीं निघालीं असून त्यांपैकीं ४८४० अंडीं उबविण्याकरितां आणि खाण्याकरितां ६१११ शेतकरी लोकांना कमी किंमतींत विकण्यांत आलीं. तसेंच, कमी दरांत ५६ लेगहार्न नर व १०७ माद्या निरनिराळ्या गांवांत पुरविल्या गेल्या.

याशिवाय, गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्मवरील नेमाडी गाईंचें दूध वाढविण्याचे बाबत प्रयत्न सुरू असून गाईंचे दुधांत दिवसेंदिवस वाढ होत असलेली दिसून येत आहे.

तसेंच, फार्मवरील कॅटल डीपमध्यें आजूबाजूचे १० मैलांचे आंतील खेड्यांवरील शेतकऱ्यांना आपलीं जनावरें मोफत टाकण्यास मिळाल्यामुळें त्यांचे अंगावरील गोचिड, गोमाशा, पिसवा यांचा नायनाट करण्यांत आला.

---

### गेल्या वर्षांतला हिंदी परराष्ट्रीय व्यापार

१९३९-४० सालांतल्या पहिल्या अकरा महिन्यांमधील हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचे प्रमुख आकडे आम्हीं "अर्था"च्या गेल्या अंकांत दिलेले आहेत. आतां त्या वर्षाच्या सबंद बारा महिन्यांत झालेल्या व्यापाराविषयींचे ठोकळ आकडे प्रसिद्ध झाले आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं, गेल्या मार्च महिन्यांत फेब्रुआरीच्या मानानें आयात व निर्गत कमी झाली. फेब्रुआरींत १५ कोटि, ८१ लक्षांची आयात झाली होती, ती मार्चमध्यें सुमारें पावणे पंधरा कोटींवर खाली आली. निगत व्यापारामध्यें उतार सुमारें २२ कोटींवरून १९½ कोटींपर्यंत झाला. १९३९-४० च्या सबंद वर्षाचे आकडे घेतले तर मात्र पूर्वीच्या सालापेक्षा आयातींत व निर्गतींत वाढावा झालेला दिसतो.

| | १९३९-४० | | १९३८-३९ | |
|---|---|---|---|---|
| | कोटि रु. | लक्ष | कोटि रु. | लक्ष |
| आयात | १६५ | २७ | १५२ | ३३ |
| निर्गत | २०३ | ९९ | १६२ | ७९ |

आयातीपेक्षा निर्गतींत अधिक वाढ होण्याचें मुख्य कारण युद्ध हें आहे, हें सांगावयास नको. ब्रिटिश साम्राज्यांतील देशांतून आलेल्या मालाची किंमत ९३ कोटि रुपये भरली. रशियांतून १९ कोटि ( पूर्वीच्या सालीं २० कोटि ) जपानमधून १९ कोटि, २४ लक्ष ( पूर्वीच्या वर्षी १५ कोटि, ४१ लक्ष ) अमेरिकेंतून सुमारें १५ कोटि ( पूर्वीच्या सालीं ९ कोटि, ७८ लक्ष ) आणि जर्मनीमधून ६ कोटि ( पूर्वीच्या वर्षी १३ कोटि ) ह्याप्रमाणें आयात मालाच्या किंमति १९३९-४० च्या व्यापारांत वाटल्या गेल्या होत्या. ब्रिटिश साम्राज्यामधील देशांस हिंदुस्थानचा ११२ कोटि, ८७ लक्षांचा माल गेला. पूर्वीच्या सालचा हा आकडा ८५ कोटि, ३७ लक्ष असा होता. ह्या आकड्यांवरून ह्या देशाच्या परराष्ट्रीय व्यापाराची दिशा कोणत्या प्रकारची होती हें स्पष्ट होईल.

---

### प्रांतिक सरकारांची निर्भयतेविषयीं लोकांना सूचना

युद्धाच्या बातम्यांचा विपर्यास करून जनतेच्या मनांत भीति उत्पन्न करण्याचा प्रयत्न कांहीं दुष्ट व उपद्व्यापी लोकांकडून होईल, त्यापासून सावध असण्याची सूचना मद्रास व बंगाल सरकारांनीं केली आहे. सरकारच्या व देशाच्या सांपत्तिक स्थितीविषयीं कोणीहि साशंक वृत्ति धरून घाबरटपणाचें कृत्य करूं नये अशी इशारत त्यांनीं दिली आहे.

## खोट्या बातम्या पसरवण्याचा शत्रूचा प्रयत्न हाणून पाडा

दुसऱ्या देशांत आपली माणसें पाठवून आणि तेथील कांहीं लोकांस हाताशीं धरून तेथें फंदफितुरीच्या आणि इतर कारवाया जर्मनी कशा करीत आहे, ह्याची आतां सर्वांस माहिती झाली असून त्या बाबतींत जिकडे तिकडे संरक्षणासाठीं योग्य खबरदारी घेतली जात आहे. दोस्त राष्ट्रें आणि त्यांचे मित्र व चहाते देश ह्यांमध्यें खोट्या बातम्या पसरवण्याचें जर्मनी वापरीत असलेलें एक शस्त्र म्हणजे रेडिओ हें होय. स्वतःच्या लोकांनीं काय वाचावें व काय ऐकावें ह्यांवर पूर्ण नियंत्रण घालून त्यांस दोस्त राष्ट्रांतून येणाऱ्या रेडिओवरील बातम्या ऐकण्याची मनाई हिटलरनें केव्हांच केली आहे. पण आपल्या रेडिओंतून जाणाऱ्या भाकडकथा दुसऱ्या देशांतील लोकांनीं ऐकून त्यांवर विश्वास ठेवावा अशी हिटलरच्या प्रभावळीची इच्छा आहे. दोस्तराष्ट्रें आणि त्यांचे मित्रदेश ह्यांमध्यें अविश्वास व गोंधळ उत्पन्न करण्याचा जर्मनीचा हा प्रयत्न वेळींच हाणून पाडणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें जर्मनीनें रेडिओच्या द्वारें चालवलेला प्रचार बंद करण्याचें ठरवलें आहे. रेडिओचे व्यापारी परवाने देण्यांत आले आहेत, त्यांमध्यें शत्रु-राष्ट्रांतून येणाऱ्या बातम्या प्रगट करण्यांत येऊं नयेत अशी नवी अट घालण्यांत यावी असा हुकूम सरकारनें पोस्ट-टेलिग्राफ खात्यास दिला आहे. खाजगी परवान्यांस ही अट लागू केली जाणार नाहीं आणि त्या बाबतींत खाजगी रेडिओ बाळगणारांच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण घालण्यांत येणार नाहीं, ही गोष्ट सरकारनें स्पष्ट केली आहे. रेडिओ सरकार जप्त करणार किंवा त्याचे बाबतींत सक्तीचे उपाय योजणार अशा उठलेल्या गप्पांचा इनकार त्यानें असंदिग्ध रीतीनें केला आहे. स्वतःसाठीं आणि स्वतःच्या कुटुंबासाठीं रेडिओ वापरणारांवर निर्बंध घातलेले नसून रेडिओ जाहीर रीतीनें ऐकणारांनीं शत्रु-राष्ट्रांतून येणाऱ्या बातम्या टाळल्या पाहिजेत एवढेंच सरकारचें नियंत्रण आहे हें लोकांनीं लक्षांत ठेवावें.

रेडिओच्या परवान्यांचे संबंधांत हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या आज्ञा-पत्रकाविषयीं खुलासा वर केला आहे. त्या संबंधांत जनतेच्या गैरसमजास जागा राहूं नये म्हणून सरकारनें माहिती दिली आहे, ती येथें उद्धृत करणें आवश्यक आहे. रेडिओच्या पेट्या वापरण्याचे सरकारी परवाने देण्यांत येतात, ते तीन प्रकारचे असतात:—(१) सामान्य परवाना धारण करणारानें स्वतःच्या खाजगी उपयोगासाठीं रेडिओ वापरावयाचा असतो. (२) सामुदायिक परवाना म्युनिसिपालिट्यांसारख्या सार्वजनिक संस्थानीं लोकांच्या उपयोगासाठीं वापरावयाचा असून शत्रु-राष्ट्रांतून येणाऱ्या बातम्यांचा त्यांच्या कार्यक्रमांत समावेश केलेला नसतो. (३) व्यापारी परवान्याचा उपयोग दुकानें, हॉटेलें इत्यादि ठिकाणीं कॉपीराइटला बाध न येईल अशा बेतानें करावयाचा असतो. कोठल्याहि देशांतून येणाऱ्या कार्यक्रमाचा उपयोग वरील नंबर १ व ३ ह्यांस करतां येतो. ह्यांपैकीं १ नंबरचा परवाना धारण करणारानें त्याचा उपयोग स्वतःसाठीं आणि स्वतःच्या कुटुंबासाठींच केला पाहिजे. ह्या मर्यादेच्या बाहेर तो उपयोगांत गेल्यास परवानावाल्यानें कायद्याचें उल्लंघन केल्यासारखें होईल. नंबर ३ चा परवाना धारण करणारास आपल्या जागेंत उघडपणानें तो वापरतां येतो आणि त्यावर आतांपर्यंत निर्बंध नव्हता. आतां शत्रु-राष्ट्रांतले संदेश प्रकट करण्यास ह्या लोकांस प्रतिबंध करण्यांत आला आहे. हिंदुस्थान सरकारचें रेडिओ वापरणाऱ्या सर्वच लोकांस असें सांगणें आहे कीं त्यांनीं शत्रु-राष्ट्रांतून येणाऱ्या कार्यक्रमांस प्रसिद्धी देऊं नये. ही प्रसिद्धी बंद करण्यांत सबंद जनतेचें हित आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांनीं सरकारशीं सहकार्य करावें. शत्रु-राष्ट्रांची बाजू त्यांच्या रेडिओंतल्या बातम्यांचेमार्फत हिंदी जनतेपुढें मांडण्यास त्यांस संधि मिळावी अशी ह्या देशांत कोणाचीच इच्छा असणें शक्य नाहीं. ह्या दृष्टीनें पहातां हिंदुस्थान सरकारनें केलेल्या सूचनेची अंमलबजावणी चोहोंकडे सहज होईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

### घाबरटपणानें स्वतःचें आणि इतरांचें नुकसान करूं नका

शत्रु-राष्ट्रांतून रेडिओवर येणाऱ्या बातम्यांचे संबंधांत हिंदुस्थान सरकारचें धोरण प्रथमपासूनच उदारपणाचें आहे. अखिल भारतीय रेडिओवरून हिंदुस्थानच्या सर्व प्रमुख भाषांत बातम्या देण्याची भरपूर तजवीज करण्यांत आली असल्यानें युद्धाविषयींचें वृत्त ऐकावयास मिळण्याची अडचण कोणासच भासणारी नाहीं. जर्मन रेडिओवरून येणाऱ्या बातम्या इतक्या अतिशयोक्तिपूर्ण आणि खोट्यानाट्या असतात कीं त्या खऱ्या वाटण्याचा मुळींच संभव नाहीं आणि बाहेरच्या देशांत भ्रामक समजुती व कल्पना पसरण्याची शत्रूची सर्व खटपट फुकट जाते ह्यांत कांहीं शंका नाहीं. जर्मनीविषयीं सहानुभूति ह्या देशांत कोणासहि वाटत नाहीं, इतकेंच नाहीं तर त्या राष्ट्रासंबंधानें हिंदी जनतेस विलक्षण तिटकारा आहे हें अगदीं स्पष्ट झालें आहे. रेडिओवरील बातम्या ऐकण्याचे बाबतींत कोणतेच निर्बंध न घालण्याचें हिंदुस्थान सरकारचें धोरण यशस्वी ठरलें आहे. हिंदी वर्तमानपत्रांनीं युद्धाच्या बातम्या प्रसिद्ध करण्यांत आणि त्यांवर आधारलेले विचार वाचकांस सादर करण्यांत जें औचित्य व जो सरळपणा प्रकट केला आहे, त्याविषयीं हिंदुस्थान सरकारनें समाधान प्रांजलपणानें व्यक्त केलें आहे. जर्मन रेडिओवरील बातम्यांचे योगानें देशाच्या कांहीं भागांत गैरसमज पसरल्याचें सरकारचे कानांवर आल्यामुळें ह्या बाबतींत बंदोबस्त वेळींच करणें त्यास आवश्यक वाटलें आहे. खोट्या बातम्या ऐकून कांहीं लोकांची दिशाभूल होऊन सेव्हिंग्ज बँकेंतून पैसे काढणें, धान्य व इतर माल विक्रीसाठीं बाहेर न आणणें, चलनी नोटा स्वीकारण्यास बिचकणें इत्यादि अनिष्ट प्रकार करण्यास ते प्रवृत्त होतात. ह्या संबंधांत लोकांची समजूत सरकार घालीत आहे आणि त्यांची खातरजमा करीत आहे. इतकें करूनहि अडाणी व भोळ्या लोकांचें रक्षण होण्यासाठीं उपाय योजनेची आवश्यकता भासल्यामुळें हिंदुस्थान सरकारनें शत्रु-राष्ट्रांच्या रेडिओवरील बातम्याविषयीं खबरदारी घेतली आहे. जनतेनें सामाजिक व आर्थिक स्थैर्याविषयीं निर्धास्त राहिलें पाहिजे. घाबरटपणानें व्यवहार बंद केल्यानें स्वतःचें व समाजाचें अनहित आपण करीत आहोंत आणि जी काल्पनिक आपत्ति टाळण्याचा आपला प्रयत्न असतो तीच स्वतःवर व इतरांवर ओढवण्यास वास्तविक आपण सहाय देत आहों ह्याची जाणीव प्रत्येकास होणें अगत्याचें आहे.

---

**अर्थशास्त्र**

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें १००, किंमत १ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

लेखक—अत्रे.

# अर्धांगी

दिग्दर्शक-विनायक

(वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे (खास व्यवस्थेखालील) **पुणें मिनर्व्हांत** पुणें-फोन ३९८ **६ वा आठवडा**

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.

भूमिकाः—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

# BHARAT
## Insurance Co., Ltd.

**COMPLETES IN 1939**

SOLID, SOUND, FRESH BUSINESS of
**OVER RUPEES**
**2 CRORES 8 LAKHS**
UNIVERSALLY RECOGNISED AS
A Leader among Indian Life Offices

*Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938*

**Rs. 22-8** for Whole-Life Policies

**Rs. 17-8** for Endowment Policies

*Chairman:* SETH RAM KRISHNA DALMIA

*Director-in-Charge:* RAJENDRA KUMAR JAIN

*BRANCHES*

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Agra | Bangalore | Delhi | Lahore | Nagapur | Rawalpindi |
| Ahmedabad | Barisal | Ernakulam | Lucknow | Najibabad | Secunderabad |
| Ajmer | Bombay | Gauhati | Madras | Patna | Shillong |
| Allahabad | Calcutta | Indore | Madura | Peshawar | Sialkot |
| Ambala | Colombo (Ceylon) | Jalpaiguri | Multan | Poona | Sukkur |
| Amritsar | Dacca | Jammu | Muzaffarpur | Rajmundry | Surat |
| Asansol | Debra Dun | Karachi | Nairobi (E. Africa) | Rangoon (Burma) | Karwar |

Head Office: LAHORE

### कस्टम्स आणि अकौंटस खात्यांसाठीं नोकरांची निवड

इंडियन ऑडिट व अकौंटस, इंपीरिअल कस्टम्स, मिलिटरी अकौंटस आणि इंडियन रेल्वे अकौंटस खात्यासाठीं नोकरांची निवड करण्याकरितां घेण्यांत यावयाच्या परीक्षेस १२-११-४० रोजीं प्रारंभ होईल. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १-७-४० ही आहे. ४०० उमेद्वारांपेक्षा अधिक उमेद्वारांचे अर्ज आल्यास त्यांतील योग्य अशा ४०० लोकांसच परीक्षेस बसविण्यांत येईल. उमेद्वाराचें वय २२ ते २५ असलें पाहिजे. विश्वविद्यालयाच्या पदवीधरांसच परीक्षेस बसतां येईल. अर्जांबरोबर उमेद्वारानें ८२ रु. ८ आ. भरावयाचे आहेत. अधिक माहिती हिंदुस्थान सरकारच्या ता. ११-५-४० च्या गॅझेटांत मिळूं शकेल.

### इजिप्शन कापसाच्या आयातीस परवानगी

इजिप्त व ब्रिटिश सुडान ह्यांमधील कापसाच्या आयातीस हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे.

### हिंदी तांदुळास मॉरिशसमध्यें मागणी

हिंदी तांदुळास मॉरिशसमधून मागणी आली असून त्याच्या पुरवठ्याची व्यवस्था होत आहे. कलकत्ता येथील व्यापाऱ्यांशीं ह्या बाबतींत वाटाघाटी झाल्या आहेत.

### दुहेरी आकाराचा माल

त्रासलेला दुकानदार (गिऱ्हाइकास):—"बाहेरून आकुंचित पण आंतून रुंद असे शूज माझ्या दुकानांत नाहींत ह्यास माझा नाइलाज आहे."

### ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या

पंधरा वर्षांचे अवधींत ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या ६० लक्षांची ७० लक्ष झाली आहे.


# दि गुड-वुइल
# ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर



मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंद्लेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंद्खेडें ( „ „ ) |
| १० अहमद्नगर ( „ अहमद्नगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | १०७–९ |
| ४% १९४३ | १०५–० |
| ३½% बिनमुदत | ८९–८ |
| ३½% १९४७–५० | १००–८ |
| ३% ( १९६३–६५ ) | ८९–४ |
| २½% १९४८–५२ | ९४–१४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०१–० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १००–८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१ ) | १०८–० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | ११८–० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% | १३१–८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००–५० ) १०% | ९७–८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०–२५ ) ४% | ३२–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १४७७–८ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३–० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ९९–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४५–३–० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास | ६३–२–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२५–० |
| कराची ( १०० ) ९% | २०७–८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२–८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १२९५–० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४८५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | ९५–८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% | ६४–० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९९२–८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७३०–० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २१६–८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४४–१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | १७–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३४–० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३७००–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०५–० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १४०–८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३५२–० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १८७२–८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | ११५–१२ |


स्पृहणीय यश

बोनसचे दरांत २० टक्के वाढ

तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें

लिहा अगर समक्ष भेटा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे

★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें

सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.

| रजिस्टर्ड ऑफिस : | बिझिनेस ऑफिस : |
|---|---|
| ७५४ शुक्रवार, पुणें २ | ९९२A सदाशिव, पुणें २ |

न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.




स्त्रियांचे रोगांवर हमखास गुणकारी.

स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी, पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५१।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंट:—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

—ॐ सत्यमेवजयते—

सुकामेवा एक आणा पार्कीट

**लोणच्याचें साहित्य**

म्हणजे

निवडक सर्व किराणा

मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल ( पॅक बाटल्या ), मेथी भरडा, स्पेशल हिंग, तांबडें लाल ( भडक ) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे !

**—: दत्तात्रय नारायण हेजीब :—**

किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २

लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

**महायुद्धाची जाणीव !** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

**तयार कपड्याचे व्यापारी**

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.